







# ज्ञान प्रबोधिनी

## स्त्री-शक्ती प्रबोधन
(ग्रामीण)
















## वार्षिक वृत्त

राष्ट्रीय शके १९४२–४३ (सन २०२०–२१)

# मनोगत

कोरोनाच्या छायेतील हे वर्ष कामाचे २६वे वर्ष पूर्तीचे! काही वर्षांपूर्वी कामाला वीस वर्षे पूर्ण झाली होती त्यावेळी आपण खोरे पातळीवरील एक मेळावा घेतला होता. त्याला गावा–गावांमधून ४,५०० महिला उपस्थित राहिल्या होत्या. हजारो महिलांनी भरलेला तो मांडव पाहून, त्यावेळी काम करणाऱ्या प्रत्येकीला आपल्याच शक्तीचा पुनःप्रत्यय आल्यासारखा झाला. त्या हरखून गेल्या. आपण भव्य मेळाव्यासारखी एखादी गोष्ट ठरवून करू शकतो असा विश्वास कर्त्या गटाला आला. स्थानिक कार्यकर्तीच्या शब्दाला किंमत देऊन भागातील महिला उंबरा ओलांडून मेळाव्याला आल्या होत्या. महिलांचा विश्वास त्यांनी मिळवला होता. त्यामुळे मेळाव्याला आलेल्या या महिलांसाठी मलाच काहीतरी केले पाहिजे, असे मेळाव्याचे आयोजन करणाऱ्या गावपातळीवरील १००–१५० महिला कार्यकर्त्यांना वाटायला लागलं. गाण्यातील राजहंसासारखे अचानक आपले पाण्यातील प्रतिबिंब पाहून आपण सामान्य बदक नाही तर राजहंस आहोत!, हा साक्षात्कार या मेळाव्यातील उपस्थितीने कार्यकर्त्यांना झाला.

या प्रचितीनंतर मात्र कार्यकर्त्या गटाने मागे वळून पाहिले नाही. कामाच्या विशी नंतर पंचविशी पर्यंतचे महिला कार्यकर्त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये केलेले काम म्हणजे पुढाकार घेऊन स्थानिक प्रश्न सोडविणे आणि स्वतःच्या गावासाठी, आणि हळूहळू खोऱ्यासाठी कामाची रचना बसवणे असे झाले.

या स्थानिक कार्यकर्त्या किशोरी मार्गदर्शिका, हिरकणी प्रेरिका, स्वयंरोजगाराचा पुढावा घेणाऱ्या झाल्या. एवढेच नाही तर गावागावातील मुलींसाठी शिकण्याची सोय व्हावी म्हणून सहनिवास सुरू करणाऱ्या, कातकऱ्यांसाठी झटणाऱ्या, पुण्यातील कॉलेजमधून नर्सिंग, MSW, कम्प्युटर मधील पदवी वर्ग करणाऱ्या, ८० हून अधिक एकल महिलांसाठी सरकारी योजना दारात आणणाऱ्या, पोलीस चौकीत जाऊन दक्षता समितीचे प्रतिनिधित्व करायला सुद्धा लागल्या. एवढेच करून न थांबता, इतरांचे अजून काही भले करायचे असेल तर मलासुद्धा अजून काही औपचारिक शिकले पाहिजे असे म्हणत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून पदवी मिळवणाऱ्या सुद्धा झाल्या!

हा विलक्षण बदल एका उद्दिष्टाने केलेल्या कामाचा परिणाम आहे. यंदाही करोनामुळे अनेक दरवाजे बंद होते तरीही 'करोना हीच संधी' असे समजून काम केल्यामुळे कामात वाढ झालेली दिसते.... तीही अगदी नैसर्गिक! त्यासाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी नवीन तंत्रज्ञान शिकून त्याचा सहज वापर केला. लॉकडाऊनमुळे प्रवास कमी झाला तरी गावागावातली कार्यकर्ती 'जागी' होती. करोनामुळे जसे–जसे प्रश्न तिच्या लक्षात येत गेले तसतसे 'आपणच ते सोडवले पाहिजेत' असा प्रश्नाचा पत्कर घेऊन तिच्या पुढाकारामुळे झालेली सगळी कामे अतिशय नेमकी झाली. गरजू माणसापर्यंत आपली मदत पोचली याचे नक्कीच समाधान आहे. वृत्तामध्ये निवेदन केलेले प्रत्येक काम जणू संधीच आहे असे समजून सगळ्या गटाने करोनाकाळात सुद्धा स्वतःच्या आरोग्याची काळजी घेऊन तरीही जिद्दीने काम केले, त्यामुळे हे सगळे घडू शकले.

सर्व जगाला वेठीला धरणाऱ्या कोरोनाच्या काळातही एवढे सगळे काम आपण करू शकलो ते देणगीदारांच्या मदतीमुळेच. वृत्त कालावधीत अनेक व्यक्ती, संस्था तसेच व्यावसायिक सामाजिक जबाबदारी मानणाऱ्या वेगवेगळ्या उद्योगांच्या सहकार्यामुळेच. अर्थातच आम्हा सगळ्यांना त्यांच्या ऋणात रहायला आवडेल.


## ♦ ज्ञान प्रबोधिनी संस्थेचे पदाधिकारी ♦

| **अध्यक्ष** | **उपाध्यक्ष** | **कार्याध्यक्ष** | **संचालक** |
|---|---|---|---|
| डॉ. रघुनाथ माशेलकर | डॉ. विजय केळकर | श. बा. तथा रवि पंडित | डॉ. गिरीश श्री. बापट |
| | कि. बा. (अण्णा) हजारे | | **कार्यवाह** |
| | | | वि. शं./सुभाष देशपांडे |


**यावृत्त कालावधीत स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण) विभागाच्या खालील गटाने काम केले.**

♦ **विभागप्रमुख : सुवर्णा गोखले** भारती खासबागे, वंदना कामठे, अश्विनी ठाकर, तृप्ती कुलकर्णी, प्रतिभा स्वामी, रंजिता सरवदे, शैला भोंडेकर, सुरेखा दिघे, स्नेहा नित्सुरे, मृणालिनी बसाळे, नवनाथ वाशिवले

♦ **या सोबत खांद्याला खांदा लावून जिजामाता प्रबोधन केंद्र प्रतिनिधींनीही काम केले. त्यांची नावे पुढील प्रमाणे :** आशा सुर्वे, निर्मला कुंभार, गंगूताई सांगळे, स्वाती शिंदे, किर्ती कोंडे, राजश्री पवार, कुंदा खंडाळकर

### विकिपीडिया : मार्च महिन्यातील स्त्री शक्ती प्रबोधनाचा शब्दशः जगावेगळा उपक्रम!!

### प्रकल्प : मराठी मुक्त ज्ञाननिर्मिती

स्त्री शक्ती प्रबोधनाच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन १८० जणांचा व्हॉटस् ॲपवर गट केला. गटाला सुबोधदादा कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. गटात सूचना देऊन दूरस्थ पद्धतीने कामाचं स्वरूप अधिकाधिक स्पष्ट केलं. या गटात ८२ जणांनी विकिपीडियाचा जागतिक पातळीवरचा पहिला महिना मार्चमध्ये भरीव कामगिरी करायची असे ठरवले. या प्रकल्पाचा मराठी भाषा उच्चार (lingwalibre) असा एक भाग होता. त्यामध्ये ४० पेक्षा जास्त जणांनी भाग घेतला आणि व्हर्च्युअल संघटित कामाने विश्वविक्रम केला! अवघ्या एका महिन्यात मराठी भाषा जगभरातल्या १८१ भाषांमध्ये ८व्या स्थानावर आली. विकिपीडियावर काम करणाऱ्या महिला एडिटर फक्त ८–१०% असल्याने 'महिला सहभाग वाढवणे' असे काम कायमच चालू असते. आपण केलेल्या या सामूहिक प्रकल्पामुळे याची जागतिक पातळीवर दखल घेतली गेली कारण या उपप्रकल्पात काम करणाऱ्या २८ पैकी २४ महिला होत्या. या संघटित केलेल्या कामाची दखल जागतिक पातळीवर घेतली गेली।

# ❖ पंचविशीतील मिळकत ❖

कामाची पंचवीस वर्ष संपायच्या वर्षी सगळीकडेच कोरोना महामारीचा प्रभाव होता, आहे ही. सगळ्या जगातच त्याचं सावट होते, तरीही या अवघड काळामध्ये आपल्या सगळ्या कार्यकर्त्यांनी अत्यंत धीराने आणि जबाबदारीने काम केले. हे वृत्त आपल्या हातात देताना त्यामुळेच अत्यंत आनंद होत आहे. ग्रामीण महिलेच्या सर्व वयोगटांसाठी आणि तिच्याशी संबंधित जवळपास सगळ्या विषयांवर आपण काम करतो. 'ती'च्या आयुष्यातील सर्व अवस्थांमध्ये आपण सगळ्याजणी एकमेकांसोबत आहोत. या धीराच्या कार्यकर्त्यांनी या सगळ्या विषयांमध्ये कसे योगदान दिले हे आपण आता वाचणार आहोत.

अगदी बालवाडीतील मुलींपासून, आयुष्याची गैरमर्जी झाल्यामुळे जिला एकटीलाच मध्य काळाचा प्रवास करावा लागतो आहे अशी एकल महिला अशा सगळ्या टप्प्यांवर आपण तिच्या सोबत आहोत. बालवाडीच्या मुली, किशोरी, माता, तरुण सखी–मैत्रीण, बचत गटातील सदस्या, शिकायला वसतिगृहात आलेली कॉलेजमधील ताई, उद्योग करून घरातील सगळ्यांचे भागवणारी महिला, शेतीत खपणारी तरुणी–मध्यमा, जगायला परत माहेरी आलेली माहेरवाशिण, संजय गांधी निराधार योजनेचा किंवा श्रावण बाळ योजनेचा आधार घेतलेली वृद्धा अशी तिची अनंत रूपं आहेत. आणि तिच्यातूनच या कोरोना काळात तिच्या मदतीला आलेली आपली हिरकणी, आरोग्य प्रबोधिका, आशा वर्कर, अंगणवाडी ताई, बचत गट प्रमुख, प्रबोधिका अशीही तिची विविध रूपे.

कोरोना काळात आपल्या सगळ्या धडपडणाऱ्या ताई या गावकऱ्यांच्या चार पावलं पुढे होत्या. त्या स्वतः कोरोनाला घाबरून घरात बसून राहिल्या नाहीत तर, त्याच्याशी जुळवून घेण्यासाठी त्याची नेमकी ओळख गावकऱ्यांनी करून घ्यावी यासाठी त्यांनी भोंगा गाडीतून गावागावात जाऊन कोरोना विषयीची जाणीव–जागृती केली. कोरोना काळात घ्यायची काळजी, मास्कचा वापर, सॅनीटायझरचा वापर, अंतर राखण्याची जबाबदारी कशी घ्यावी हे त्यांनी सांगितले. हे सांगताना ती स्वतः जोखीम घेऊन गावागावात गेली. जेव्हा सगळे घराघरात कोरोनामुळे बसून होते तेव्हा स्वच्छता दूत, पोलिसांप्रमाणे आपली ही कार्यकर्ती भोंगा गाडी घेऊन गावागावात गेली.

हे करताना दूरदूरच्या डोंगरातील घरांमध्ये खाण्यापिण्याच्या जरुरीच्या गोष्टींची असलेली कमतरता, तिला जाणवली तेव्हा कातकरी वस्तीमध्ये, धनगर वस्त्यांवर ती गेली, टेम्पोतून तिने पुण्याहून किरणामाल आणि आवश्यक सर्व वस्तू आणल्या, आणि गावातल्या दुकानदारालाही विक्रीकरिता दिल्या.

ज्या शेतकऱ्यांच्या शेतात भाजी, फळे होती, ती तिथून घेऊन पुण्यातील सोसायटीमधून जिथे या गरजेच्या वस्तू मिळत नव्हत्या तिथे तिने पोहोचवल्या, यामुळे गावातील शेतकरी महिलेला पैसे मिळाले आणि शहरी महिलेपर्यंत लॉकडाऊन मुळे ज्या वस्तू पोहोचत नव्हत्या त्या तिने पोहोचवल्या. हे या वर्षीचे वृत्त तुमच्या हातात देताना तिच्या कामाला २५ वर्षे पूर्ण होत आहेत. या काळात ती खूप शिकलीय्. करोनाच्या संकटाने घाबरून घरात गांगरलेल्या अवस्थेत न रहाता ती घराबाहेर पडलीय्. आता ती २५ वर्षांपूर्वी होती तशी एखाद्या प्रकल्पात काही नव्याने शिकायला बाहेर पडली नाहीये तर आजवर मिळालेला शिक्षणाचा निचोड ती आता सगळ्यांना वाटतीय्. तीच आरोग्य सखीमध्ये वेगवेगळ्या तपासण्या करणारी डॉक्टरांची सहकारी झालीय्. उंबऱ्याबाहेर पडून गावातल्या उंचवट्यावर जिथे मोबाईलची रेंज येते तिथे जायला लागलीय्. 'मला मेलीला काय करायच्या आहेत या लष्करच्या भाकऱ्या भाजून?' असे न म्हणता, माझ्या गावातले प्रश्न मीच सोडवले पाहिजेत असे म्हणून पुढाकार घेणारी झालीय्. कातकरी वस्तीवरील वर्गही या अवघड काळात तिने चालू ठेवले. त्यांच्यापर्यंत आवश्यक वस्तू पोहोचवल्या, त्यांना आधार कार्डांची ओळख मिळवून द्यायला मदत केली. कातकऱ्यांचे अस्तित्व कागदावर यावे म्हणून धडपडली, शेतकरी महिलेच्या मालाला बाजारभाव मिळावा म्हणून झटली. या वृत्तात जेवढे–जेवढे प्रकल्प आपण वाचता आहात तेवढ्या–तेवढ्या प्रकाराने ती या कोरोनावर उत्तर शोधायला बाहेर पडलीय्. आता पंचविशीत तिने असा दीर्घ श्वास घेऊन पदर खोचला आहे. तिच्या कामाचा हा विलक्षण असा प्रवास वाचूयात या वृत्तात.

- **या काळातील कार्यकर्त्यांचे विशेष!**

**झूम ॲप वापराचे प्रशिक्षण :** या वर्षीच्या कामाचे विशेष म्हणजे ग्रामीण महिला तंत्रज्ञान वापरायला शिकली. वर्ष सुरू होतानाच लॉकडाऊन होते म्हणून संपर्कासाठी झूम मिटिंग घेण्याची गरज होती. त्या निमित्ताने विभागातील ३५ स्थानिक कार्यकर्त्या झूम मिटिंगमध्ये सहभागी व्हायला आणि घ्यायला शिकल्या. त्यात झूम ॲप डाऊनलोड करण्यापासून योग्य सहभागासाठी आवाज व व्हिडिओ चालू आणि बंद करणे, स्क्रीन शेअर करणे, सहभागी व्यक्तींची लिस्ट बघणे, बोलण्यासाठी 'हॅन्ड रेज' करणे हे शिकल्या. सरावाने त्याही मिटिंग शेड्युल करायला शिकल्या. या सगळ्यामुळे कामाला गती आली आणि गरजेचे काम झाले.

- **कोविड–१९ लढा प्रकल्प**

एप्रिल–जून या काळात हा प्रकल्प केला. वेल्हे तालुक्यात कोरोनाची पहिली केस सापडल्यानंतर लोकांमध्ये भीती पसरली होती. या आजाराविषयी अनेक गैरसमज ग्रामस्थांच्या मनात होते. गावातील लोकांना कोरोना या आजाराविषयी शास्त्रशुद्ध माहिती मिळावी व त्यांच्या मनातील भीती कमी व्हावी या हेतूने एक महिन्याच्या कालावधीचा 'कोविड–१९ लढा' प्रकल्प जानकीदेवी बजाज ग्राम विकास संस्थेच्या मदतीने १५ मे २०२० पासून वेल्हे तालुक्यातील २० गावांसाठी सुरू झाला.

या प्रकल्पाद्वारे प्रथमच आपण २० गावांमधील स्थानिक कार्यकर्त्यांचा एक गट तयार केला. पुण्यातून कोणी कार्यकर्त्या तिकडे जाऊ शकत नव्हत्या, रोज दुपारी ४ वाजता एक झूम मिटिंग घेऊन कार्यकर्त्यांना त्यांनी काय काम करायचे याविषयी मार्गदर्शन करायचो व त्यांना गावात प्रत्यक्ष काम करताना काय अडचणी येतात याविषयी चर्चा करून त्या कशा प्रकारे सोडवता येतील याविषयी बोलायचो.

या प्रकल्पात पुढीलप्रमाणे काम झाले...

गुगल फॉर्मद्वारे कोरोनाविषयी एक प्रश्नपत्रिका भरून घेणे– युवक विभागाने कोरोनाविषयी एक प्रश्नावली तयार केली होती. त्या आधारे एक प्रश्नावली तयार करून गावातील लोकांना कोरोनाविषयी सध्या नेमकी काय माहिती आहे हे जाणून घ्यायचा प्रयत्न केला. २० गावांमधून साधारण १३०० गुगल फॉर्म भरून झाले. ज्यांनी ही प्रश्नावली भरून दिली त्यांना या प्रश्नांच्या योग्य उत्तरांचा एक मेसेज लगेच आपण पाठवला. याशिवाय कोरोनापासून स्वतःचा, कुटुंबियांचा बचाव आपण कसा करू शकतो, याविषयी शास्त्रशुद्ध माहिती देणारे मेसेजेस आपण सगळ्यांना पाठविले.

२० गावांमध्ये भोंगा गाडी फिरवून स्पीकरवरून महिती आपण ऐकवली. त्यामुळे ज्यांना फोनवर गुगल फॉर्म भरता येत नाहीत अशा लोकांपर्यंतही आपण ही माहिती पोहोचवू शकलो. शेतात काम करणारे लोकही ही माहिती त्यामुळे ऐकू शकले.

कोरोनाची माहिती देणारे प्रत्येकी चार असे फ्लेक्सही करून आपण २० गावांमध्ये लावले. आपली माजी विद्यार्थिनी प्रेरणा सेठिया हिने याविषयी माहिती देणारे उत्तम फ्लेक्स व पुस्तिका खूपच कमी वेळात करून दिली.

या प्रकल्पाचा महत्त्वाचा भाग म्हणजे गावातील जबाबदार व्यक्ती जसे की आशा वर्कर्स, अंगणवाडी ताई यांचे प्रशिक्षण डॉ. वैशाली बिनीवाले, डॉ. प्राजक्ता दोशी, डॉ. वैदेही केळकर या आपल्या माजी विद्यार्थिनींनी घेतले. इतक्या वर्षांचा नियमित संपर्क व स्थानिक कार्यकर्त्यांशी असलेले आपले विश्वासाचे नाते यामुळेच अशा प्रकारे हा प्रकल्प आपण यशस्वीरीत्या राबवू शकलो असे वाटते.

या प्रकल्पामुळे गरज लक्षात आली आणि हे सुरू केलेले काम आरोग्य सखी प्रकल्पात पुढे चालू ठेवले.

१. **कोरोना जाणीव–जागृती :** कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव बघता जुलै ते डिसेंबर २०२० या कालावधीत वेल्हे तालुक्यातील ४० गावांमध्ये कोरोना विषयी जाणीव जागृतीचे काम मोठ्या प्रमाणावर या प्रकल्पातून केले. यासाठी घरोघरी जाऊन माहिती सांगणे, भोंगा गाडीद्वारे माहिती सांगणे, मास्क वाटप, माहिती पुस्तिका वाटप, पोस्टर्स लावणे या गोष्टींचा अवलंब केला. ५००० लोकांपर्यंत आपण कोरोनाची योग्य माहिती या कामातून पोहोचवली.

२. **शिधा वाटप :** ऐन कोरोना काळात ज्यांचे हातावरचे पोट होते त्यांना खाण्याचीच भ्रांत होती अशा कातकरी, एकल महिला, पर प्रांतीय मजूर, ज्येष्ठ नागरिक अशा ४५१ कुटुंबांना शिधावाटप केले.

३. **शेती साहाय्य :** शेतीसाठी बी–बियाणे पुरवले. पंतप्रधानांनी घोषणा केली आहे असे रु. ४.७० लाखाचे शेतीसाठीचे कर्ज बचत गटातील महिलांना मिळवून दिले.

४. **खेळते भांडवल :** लॉकडाऊन नंतर पुन्हा एकदा व्यवसाय सुरू करायला लागणारे किरकोळ कर्ज ३८ जणींना प्रत्येकी रु. १०,०००/– प्रमाणे ३.८ लाख रुपये बचत गट सभासदांना वाटप केले.

५. या शिवाय गरजूंना औषधे, बाजार बंद असल्यामुळे परसबाग करायला बिया वाटप, दुकाने व वहातूक बंद असल्याने वेल्ह्याच्या सहनिवासातील मुलींच्या मदतीने दूरवरच्या वस्त्यांवर किराणा माल विक्री.... असे आपल्या भागातल्या लोकांशी संवाद करताना जे–जे गरजेचे होते ते–ते सर्व केले. नेमक्या गरजा सांगणारा स्थानिक महिलांचा गट नित्य संपर्कात होता त्याने खांद्याला खांदा देऊन काम केले म्हणूनच केवळ हे सगळे घडू शकले!

लॉकडाऊनमध्ये अनेक जण अडकून पडले. पण ही कार्यकर्त्यांची फौज रात्रंदिवस काम करत होती म्हणून त्यांचा एक अनुभव कथनाचा कार्यक्रम वेबीनार स्वरूपात ठरवला होता.

६. **फेसबुक लाईव्ह वेबीनार बिकट वाट ही तरी.... :**

१६ ऑगस्टला सकाळी बिकट वाट ही तरी.... या नावाने फेसबुक लाईव्ह वेबीनार कार्यक्रम केला. त्यात कोरोना काळातल्या मदतीच्या कामाच्या अनुभवावर आधारित वेबीनार झाला. हे करण्यासाठी अठरा जणींच्या गटाने सराव करून पहिला यशस्वी प्रयोग केला. त्यासाठी भरपूर मेहेनत घेतली. युवती, निवासातील मुली, भागातल्या कार्यकर्त्या यांनी स्वतः काम केले असल्यामुळे पुरेशी तयारी करून आत्मविश्वासाने सादरीकरण केले. एक नवे तंत्र गट म्हणून चांगले आत्मसात केले. त्या दिवशी झूम वर १०० जण तर यूट्यूब चॅनेलवर २६० जणांचा लाइव्ह सहभाग होता. तर नंतर काही काळात ८५४ जणांनी यूट्यूबवर हा कार्यक्रम पाहिला. ऑनलाईन लाईव्ह कार्यक्रम सादर करणे हे एक चांगले गटकार्य झाले. कार्यक्रम बघणाऱ्यांनी सर्व स्थानिक महिलांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. कोरोनाच्या काळातह कोणीही न घाबरता इतक्या प्रतिकूल परिस्थितीतही काम केले. स्वतःची आणि गावकऱ्यांची काळजी घेतली याबद्दल वेबीनारला आलेल्या सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले.

**मर्क्स कंपनी सोबतचे कोरोना काळातील काम :-** कोरोना काळ जसा अत्यंत कठीण होता तसेच या काळात मदतीला पुढे येणारे हातही खूप होते. मर्क्स कंपनीने केलेल्या सहकार्यातून आपण पुढील गोष्टी करू शकलो. ही मदत गावातील लोकांपर्यंत पोहोचवताना मुद्दाम आपण अशा गावांची निवड केली की जी गावे अतिशय दुर्गम असल्याने तिथे कोणाची मदत पोचलीच नव्हती. या निमित्ताने गरजूंपर्यंत पोहोचणे आणि नवीन गट आपल्या कामाशी जोडणे असे आपण केले.

**फिल्टर वाटप :** २० पेक्षा जास्ती मुले ज्या आंगणवाड्यांमधून शिकत आहेत अशा २० ठिकाणी पिण्याच्या पाण्याचे फिल्टर वाटप केले.

**आरोग्य किट :** डेटॉल साबण, सॅनिटायझर, सॅनिटरी नॅपकिन, तसेच मास्क अशा चार गोष्टींचे एक पाकीट अशी १०० पाकिटे आपण भोर, वेल्हे आणि हवेली अशा तीन तालुक्यांतील ५० गावांमध्ये करोनासंबंधी काम करणाऱ्या महिला कार्यकर्त्यांना दिली.

**खेळ :** आरोग्य विषयक जाणीव–जागृती करणाऱ्या बारा खेळांचा एक संच आपण २० गावांमध्ये वाटला. खेळ कसे खेळायचे या विषयी गावातील कार्यकर्तीचे ऑनलाईन प्रशिक्षण शैक्षणिक साधन केंद्राच्या पल्लवीताई पराडकर यांनी घेतले. त्यानंतर हे खेळ २० गावांमध्ये देण्यात आले ते दलामध्ये सहा महिने खेळले गेले.

**शिधा वाटप :** १६ गावांमधील ११० गरजू कुटुंबांपर्यंत आपण चहा, साखर, कडधान्ये, गहू, तुरडाळ असे आवश्यक शिध्याचे वाटप केले.

### • त्याशिवाय आपल्या करोना काळातील कामाची वेगळी दखल घेतली गेली

**१. चतुरंग गप्पा :** लोकसत्ताच्या चतुरंग गप्पा कार्यक्रमात सुवर्णाताई गोखले यांची कोरोना काळात केलेल्या कामासंदर्भात **ऑनलाईन** मुलाखत झाली. त्यात साडेसहा टन झालेल्या भाजीविक्री बद्दल आणि शिधावाटप व आरोग्य कामा विषयी बोलायची संधी मिळाली. ग्रामीण स्त्रिया कशाप्रकारे आत्मनिर्भर होत आहेत असे त्यांचे निवेदन होते.

**२. स्त्रीवादी कार्यकर्त्या आणि प्रख्यात लेखिका माननीय मंगलाताई गोडबोले यांची कामाला भेट :** मा. मंगलाताई यांनी कामाला भेट दिली आणि कोरोना काळात गावपातळीवर परिणामकारक काम करणाऱ्या अनेक ग्रामीण कार्यकर्त्यांशी त्या प्रत्यक्ष आणि ऑनलाइन भेटल्या. जिला कोणत्याही प्रकारची संधी उपलब्ध नाही, तरीही जिने परिस्थिती समोर आपल्या कर्तृत्वाने मोठी रेघ ओढली आहे, आपले जीवन संपूर्णपणे बदलले आहे, आपल्या मुलाबाळांच्या आयुष्याचा पोत बदलण्यासाठी जी धडपड करीत आहे, कोरोना महामारीच्या काळातही जी न डगमगता संकटाला तोंड देते आहे अशा बचत गटातील अल्पशिक्षित पण धडपड्या महिलांना त्या भेटल्या. बचत गटाच्या कामातील संभाव्य ताकद जाणून मंगलाताईंनी साप्ताहिक सकाळ दिवाळी अंकामध्ये एक दीर्घ लेखही या कामाबद्दल लिहिला हे विशेष !

**३. संधीचे केले सोने :** मार्च महिन्यात आचार्य अत्रे कट्टा, ठाणे यांच्यावतीने महिला दिनानिमित्त आयोजित केलेल्या 'संधीचे केले सोने' या कार्यक्रमात कोरोना काळातही कामात खंड न पडता आपला ठसा उमटवत राहणाऱ्या तीन जणींचा सत्कार करण्यात आला. त्यात सुवर्णाताईंनी कोरोना काळात आपण केलेल्या मदत कामासंदर्भात मांडणी केली.

**४. बोल बरवा** या यूट्यूब चॅनल वरूनही असाच एक कार्यक्रम झाला. अत्यंत उत्स्फूर्त असा प्रतिसाद या कार्यक्रमाला मिळाला आणि कठीण काळामधील आपल्या मूलभूत अशा कामाची समाजाने आवर्जून दखल घेतली.

## बचतगट

**जिजामाता प्रबोधन केंद्राचे बचत गट**

| गावे | गट | संख्या | सभासद | बचत (रु.) |
|---|---|---|---|---|
| हवेली | २ | ६ | १२३ | १,२३,००० |
| वेल्हे | ४८ | ११७ | २०३९ | २,४४,०५० |
| भोर | ९ | ८२ | १३६४ | ३,७८,५०० |
| सातारा | १ | ४ | ५१ | ५,१०० |
| पुणे | १ | ४ | ७० | ६५,००० |
| **एकूण** | **६१** | **२१३** | **३६४७** | **८,१५,६५०** |

ज्ञान प्रबोधिनी मार्गदर्शित २१३ बचत गट जिजामाता प्रबोधन केंद्राने चालवले. या सर्व बचत गटात मिळून दरमहा ८,१५,६५०/– रु. बचत होते. ६१ गावांत चालणारे हे गट १२ विभागांना जोडले होते. ह्या वर्षी शाश्वत प्रकल्पाच्या निमित्ताने तीन गावांचा मिळून एक नवीन विभाग झाला. बहुतेक सगळ्या गटांत अंतर्गत कर्ज वाटप हे २% दरमहा दराने केले जाते, फक्त ५ गट अंतर्गत कर्ज १% दरमहा दराने करतात. गट सुरू होताना ३–५ वर्षं अशी ठरलेली मुदत संपल्याने वृत्तान्त वर्षात ४० गटांचे वाटप केले. त्यापैकी ३० गट नव्याने पुन्हा सुरू झाले. जास्त उलाढाली करणारे गट आता स्वयंपूर्ण झाले असल्याने विभागाशी जोडले नाहीत. निगडे, तेलवडी, भोरडी, वरोती, कोदापुर ह्या दुर्गम पाच गावांत नव्याने बचत गटाचे काम सुरू केले.

**खेळते भांडवल –** नियमित बचत गटातील भांडवल कमी पडते आहे अशा २९ जणींना गरजेप्रमाणे भांडवल पुरवले. वर्षभरात वेगवेगळ्या प्रकल्पात मिळून एकूण ४१ गावांतील ८९ जणींना वेगवेगळ्या कारणांसाठी १८,५०,३१०/– रु. खेळते भांडवल देऊन आर्थिक मदत केली. हे भांडवल मुख्यतः गावपातळीवर छोटे उद्योग व्यवसाय करण्यासाठी दिले आहे. त्याचा उपयोग महिलांनी शेती, शेवई मशीन खरेदी, शिलाई मशीन खरेदी, गाडी दुरूस्ती अशा कारणांसाठी केला.

बचत गट व त्यावर आधारित खेळते भांडवल हा प्रकल्प जिजामाता प्रबोधन केंद्राच्या सहकार्याने राबवला गेला.

## स्वयंरोजगार

### धनश्री प्रकल्प



या वर्षी इलेक्ट्रॉनिका फायनान्स कंपनीच्या आर्थिक मदतीने स्वयंरोजगार कामाला चालना देणारा 'धनश्री प्रकल्प' केला. यात प्रकल्पाचे उद्दिष्ट स्वयंरोजगार प्रशिक्षण व उत्पादनातून अर्थ निर्मिती असे ठेवले होते. नसरापूर, आंबवणे व वेल्हे या तीन केंद्रावरुन धनश्री प्रकल्प राबवला.

**नसरापूर केंद्र :** पार्लर, मणीकाम, पेपर क्विलिंग, भरतकाम, इमीटेशनचे दागिने, कापडी तोरणे, यांची १४ प्रशिक्षणे घेतली. त्यात १०१ जणी सहभागी झाल्या होत्या.

**आंबवणे केंद्र :** मास्क, पिशव्या, पाकिटे आणि शिवणाचे मूलभूत शिक्षण देणारा शिवणाचा वर्ग झाला. आंबवणे केंद्रात वर्षभरामध्ये एकूण सात प्रशिक्षणे घेतली, त्यात ४२

जणींनी विविध कौशल्यांचे प्रशिक्षण घेतले.

**वेल्हे केंद्र :** वेल्ह्यामध्ये पापड, पापडी, कुरडई, नाचणी-रवा अशी दहा प्रशिक्षणे झाली. त्याला ११ गावांमधून ४० जणी आल्या होत्या.

**महत्त्वाचे :** करोनामुळे प्रवासाची कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्यामुळे गाडीची व्यवस्था केल्यामुळे गावागावातून प्रशिक्षणार्थी वर्गाला येऊ शकल्या. या वर्षी गटाच्या नावाने खाद्यपदार्थ निर्मिती आणि विक्रीसाठी लागणारे परवाने (लायसन्स) मिळविले. कोरोनाने आपल्याला संपूर्ण लायसन्सिंग च्या प्रक्रियेचे ऑनलाईन सुविधा कशी आहे ते शिकविले.

**ऑनलाईन विक्री :** धनश्री प्रकल्पात भाजी विक्री केली. त्यावरचा तपशिलातला लेख शेवटी दिला आहे. त्या भाजी विक्रीमुळे १००० नव्या हितचिंतकांची यादी तयार झाली. त्यांना ऑनलाईन पद्धतीने ग्रामीण महिलांनी उत्पादित केलेल्या अनेक वस्तू विकल्या.

धनश्री प्रकल्पातील सरावाने आम्हाला आत्मविश्वास दिला. यामध्ये मुखपट्टी (मास्क) ची शिलाई आणि विक्री करणाऱ्या गटाने तर १,६०,०००/- रुपयांची विक्री केली.

धनश्री प्रकल्पातून उभ्या केलेल्या ५०,०००/- रुपयांच्या खेळत्या भांडवलातून वर्षभरात १६,००,०००/- रुपयांची विक्री झाल्याने सगळ्यांचाच विश्वास वाढला.

वेल्हे, नसरापूर आणि आंबवणे या तिन्ही केंद्रात या प्रकल्पातील गटप्रमुखांचे बाजारा विषयीची जाणीव तसेच उत्पादनाचा दर्जा (market awareness and product quality) या विषया वरील प्रशिक्ष



| | नसरापूर | आंबवणे | वेल्हे | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्रशिक्षणार्थी | १०१ | ४२ | ४० | १८३ |
| प्रशिक्षणे | १४ | ७ | १० | ३१ |

## शाश्वत प्रकल्प

जानकीदेवी बजाज ग्राम विकास संस्थेच्या आर्थिक मदतीने शेतकऱ्यांच्या उत्पादकता वाढवण्यासाठी केलेला हा प्रकल्प आडवली, आस्कवडी आणि मार्गासनी या तीन गावांत करत आहोत. या प्रकल्पा अंतर्गत नवीन १३ गटांचा विभाग तयार केला. या विभागातील गटांची बँकेत खाती काढली. त्यासाठी बैठकीत २२ गट प्रमुखांची पॅनकार्ड काढली. शेतमालाच्या विक्रीतून ग्रामीण महिलांचे जीवनमान उंचावण्याचे काम चालू आहे. शाश्वत प्रकल्पाच्या गावातील ११ महिलांना ३१ मार्च पर्यंत ८.६० लाख रुपयांचे कर्ज दिले, जे भांडवल म्हणून वापरून उत्पन्न वाढ होईल. या प्रकल्पा अंतर्गत आडवली गावात चार प्रशिक्षणे झाली. त्यात गव्हले, बटाटा कीस, पोहा डांगर, पुरण शिकवले तर मार्गासनी गावात खिचे पापड व साबुदाणा चकली बनवण्याचे प्रशिक्षण झाले. सोयाबीन पासून दूध, दही आणि पनीर शिक्षण देणारा वर्ग तीनही गावांसाठी घेतला.

यंदा आडवली गावातून स्ट्रॉबेरी, मार्गासनीतून तांदूळ असे विक्रीसाठी आणले. महिलांनी बनवलेल्या विविध गोष्टींची १५०० किलो विक्री केली.


## राम-सीता पुराणिक तंत्र निकेतन प्रकल्प

कोरोनामुळे आलेल्या मर्यादा लक्षात घेऊनही वर्षभरात शिवापूर केंद्रात ३७ विद्यार्थिनींना प्रशिक्षण देण्यात आले. त्यात प्राथमिक शिवण, उशीचे अभ्रे, रोटी रुमाल, मास्क आणि वेगवेगळ्या प्रकारच्या पिशव्या व पर्स याचे प्रशिक्षण चौदा जणींना दिले. विक्रीसाठी तीन कंप्यांमध्ये स्टॉल लावले. या विक्रीसाठी जे उत्पादन केले त्यातून ३३,४४५/- रुपयांची मजुरी दिली. उत्पादित वस्तूंची २,००,०००/- रुपयांची विक्री झाली. राम-सीता पुराणिक तंत्र निकेतनातून प्रशिक्षण घेऊन उद्योजक बनलेल्या २० जणींची माहिती एकत्र केली. या शिवाय दिवाळीला मण्याच्या आकाश कंदिलांचे उत्पादन केले. तसेच वर्षभरात १६७० चॉकलेटचे उत्पादन आपण करून घेतले. वर्षभरात दहा जणी नियमित शिवण वर्गाला येत होत्या.

### ♦ विशेष ♦

**सूर्यनमस्कार**

- १२ जानेवारी ते २६ जानेवारी या कालावधीत आम्ही ग्रामीण गटाने १०,००० सूर्यनमस्कार घालायचा संकल्प केला.
- सहभागी होणाऱ्यांचा व्हॉट्सॲपचा गट केला. प्रत्यक्ष ११० जणींनी सहभाग घेतला. काहींचा प्रातिनिधिक सहभाग. ✻ किशोरी, युवती, हिरकणी, महिला मिळून २७० जणींचा सहभाग ✻



- नियोजित कालावधीत एकूण १०,०४८ सूर्यनमस्कार घालून उद्दिष्ट पूर्ण केले.
- या गटात अशाही काही जणी होत्या की ज्यांनी आयुष्यात पहिल्यांदाच असे नमस्कार घातले!

# आरोग्य

## आरोग्य सखी प्रकल्प

आरोग्य सखी प्रकल्प जानेवारी २०१९ मध्ये वेल्हे तालुक्यातील ५० गावांसाठी सुरू झाला. कोरोनानंतर जुलै २०२० मध्ये या प्रकल्पाचे दुसरे वर्ष सुरू झाले. यावर्षी आपण वेल्हे व भोर तालुक्यातील ३० गावांची भर या प्रकल्पात घातली व एकूण ८० गावांतील महिलांपर्यंत आरोग्याचे विविध विषय घेऊन जायचे ठरवले. या ८० गावांची तीन क्लस्टरमध्ये विभागणी केली व तीन प्रमुख यासाठी नेमले.

**जाणीव–जागृती सत्रे :** दुसऱ्या वर्षामध्ये ओळख स्पर्शाची, मासिक पाळी संदर्भातील माहिती, गर्भाशयाचा कर्करोग व इतर स्त्री रोग, जंत संसर्ग, तंबाखूचे दुष्परिणाम, मानसिक आरोग्य, आरोग्य विमा अशा ८ विषयांची १३० जाणीव जागृती सत्रे घेतली व १७३७ लोकांपर्यंत हे विषय पोहोचवले.



**आरोग्य तपासणी :** डोळे तपासणी, गर्भाशय कॅन्सर तपासणी, गरोदर माता तपासणी, दात तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी, बाल आरोग्य तपासणी अशा सहा प्रकारच्या एकूण ४९ तपासण्या खेड्यापाड्यांतील ७३६ महिला व मुलांपर्यंत आपण पोहोचविल्या.

**बाल आरोग्य तपासणी :** डिसेंबर २०२० पासून दर महिन्याला एकदा अशी बाल आरोग्य तपासणी झाली. त्यात एकूण ९५ मुलांची तपासणी झाली. मार्च २०१९मध्ये झालेल्या लसीकरणात ६१ मुलांचे वजन व उंची कमी आहे असे लक्षात आले होते. त्यांचा पाठपुरावा केला. सात मुलांना गरजेचे वाटल्यामुळे पोषक आहार तक्ता व टॉनिक सुद्धा दिले. बाल आरोग्य तपासणीच्या कामात आठ प्रशिक्षकांचा गट तयार केला आहे. या गटाला दरमहा प्रशिक्षण दिले जाते. नवजात शिशुच्या माहितीचे फॉर्म या गटांकडून भरून घेतले जातात. बाळाच्या वाढीचे टप्पे मोजण्याचे प्रशिक्षण घेऊन पाच महिने बाळाला तपासणे आणि वाढीचा पाठपुरावा केला जातो. डी व्हिटॅमिन सुद्धा या नवजात बालकांना दिले जाते. या माहितीचा पुढील तपासणीसाठी चांगला फायदा होतो.

**किशोरी विकास उपक्रम :** हा पुढील पिढीच्या जडणघडणीतील महत्त्वाचा उपक्रम. चार शाळांमधून होणारी इ. ८वीच्या विद्यार्थिनींची व्यक्तिमत्त्व विकसन या विषयाची दहा सत्रे ६८ मुलींसाठी शाळा बंद असतानाही गाव पातळीवर घेऊ शकलो. कोरोनामुळे किशोरी विकास उपक्रमाची सत्रे यावर्षी नेहमीप्रमाणे झाली नाहीत. तरीही पुढील कार्यक्रम वृत्त काळात झाले. या उपक्रमात सहभागी झालेल्या शाळा : दापोडे, साखर, मंजाई आसनी, सोंडे माथना अशा आहेत. झालेली सत्रे पुढील प्रमाणे :–

**पूर्व चाचणी परीक्षा :** किशोरी विकास उपक्रमात सहभागी होण्याची इच्छा असणाऱ्या मुलींची पूर्व चाचणी परीक्षा शाळा– शाळांमधून घेतली. याला वेल्ह्यातील चार शाळांमधील ४३ जणी उपस्थित होत्या.

**उपक्रम परिचय :** वरील शाळांमधील मुलींना किशोरी विकास या उपक्रमाचा परिचय व्हावा व व्यक्तिमत्व विकसना सोबतच या उपक्रमातील कौशल्य प्रशिक्षण, वृत्ती घडणाचे वेगवेगळे उपक्रम त्यांच्या ओळखीचे व्हावेत यासाठी सत्रे घेण्यात आली. किशोरी विकास उपक्रम हा कोणताही शिकवणी वर्ग किंवा कौशल्य वर्ग नसून एकूण आपले शिक्षण, वर्तन, व्यवसाय, छंद, वाचन, मनन, चांगल्या सवयी यांचे महत्त्व आपल्याला पटावे व आपले वागणे त्याप्रमाणे होण्याचा आपण प्रयत्न करावा यासाठी असते हे या प्राथमिक सत्रातून त्यांच्या लक्षात येते. अर्थात विविध कृती वर्षभर केल्याने ते त्यांना पटायला लागते.



यात यावर्षी व्यक्तिमत्त्व विकसन म्हणजे काय, शारीरिक विकसन गटकार्य, अनुभव कथन, मानसिक विकसन, निरीक्षण कौशल्य या विषयांवर सत्रे झाली. या शिवाय भरतकाम, क्विलिंग या हस्त कौशल्यांचे प्रशिक्षण झाले. यात क्विलिंग पेपरपासून राखी बनवायला शिकवली. गावपातळीवर झालेल्या तासिकांची उजळणी झाली. सुंदर हस्ताक्षर, वेध यशाचा, जिद्दीची लोभस रूपे अशा वाचनासाठी तीन पुस्तिका व कंपास पेटी किशोरींना भेट दिली.

**बौद्धिक विकसन :** बौद्धिक विकसनातील निरीक्षण, स्मरण व आकलन या तीन पैलूंची माहिती खेळातून दिली.

**गाव भेटी :** अकरा गावांतील ३८ किशोरींच्या गृहभेटी झाल्या. वाचनासाठी महिलांच्या चरित्रांचे पुस्तक व छात्र प्रबोधनचा अंक किशोरींना वाचायला दिले. व काही लेख मुलींना लिहायला सांगितले.

**दल :** मुलांसाठी व्यायामाचे/ खेळाचे महत्त्व शिकविणाऱ्या दलामध्ये साधारण १५० मुलं सहभागी होतात.

**प्रशिक्षणे :** आशा वर्कर्सचे एक प्रशिक्षण व अंगणवाडी ताईंची दोन प्रशिक्षणे झाली. गावात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या १३० महिलांपर्यंत

विविध आरोग्य विषयक विषय आपण पोहोचवले.




**बाल आरोग्यासाठी हिरकणी सहभाग :** बाल आरोग्य तपासणीसाठी सात जणींनी संधी घेतली. त्यांचे नवजात शिशूंच्या वाढी विषयीचे प्रशिक्षण झाले. मुलाच्या डोक्याचा घेर घेणे, दंडाचा घेर घेणे, वजन इत्यादी गोष्टींचे त्यांचे प्रशिक्षण झाले. या गटाने दहा गावांमधील ४६ नवजात बालकांची दरमहा सर्व प्रकारची मोजणी केली. 'ओळख स्पर्शाची' यामध्ये चार जणींनी प्रशिक्षण घेतले आणि सत्रे घेतली. ९ जानेवारी रोजी होणाऱ्या रक्तदान शिबिरात चार जणींनी रक्तदान केले आणि आयोजनात सहभाग घेऊन १७५ व्यक्तींसाठी जेवण बनवून त्यांना वाढले.



**अंगणवाडी ताई प्रशिक्षण :** जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने १०० अंगणवाडीताईचे 'मानसिक आरोग्य' व 'कोरोना काळात घ्यायची काळजी' या विषयावर प्रशिक्षण सत्रे झाली.

आरोग्य सखी प्रकल्पाच्या या सर्व उपक्रमांमधून १९२ सत्रांच्या माध्यमातून २,६७१ महिलांपर्यंत आरोग्य हा विषय पोहोचविण्यात आपण यशस्वी झालो आहोत. याशिवाय, कोरोना जाणीव–जागृती उपक्रमांधून ५००० लोकांपर्यंत आपण पोहोचलो आहोत. दहा सदस्यांची एक मुख्य टीम दर महिन्याला वेल्ह्यात जमते. आधीच्या महिन्यात झालेल्या कामाचे निवेदन व पुढील महिन्यातील कामाचे नियोजन या बैठकीत केले जाते. एकूणच कामाची व्याप्ती जास्त असल्याने यातील प्रत्येकीला गावपातळीवर काम करणाऱ्या स्थानिक कार्यकर्त्यांचा गट जोडलेला आहे. या सर्व प्रकल्पांच्या कार्यवाहीसाठी ६५ क्षेत्र कार्यकर्त्यांचा गट या कामात सहभागी आहे. या कार्यकर्त्या गावांमध्ये आरोग्यविषयक जाणीव–जागृती सत्रे घेणे, त्यांचे आयोजन करणे, विविध आरोग्यविषयक तपासण्या आयोजित करण्यात मदत करणे, यासारखी कामे करतात. यासाठी त्यांचे वेळोवेळी प्रशिक्षणही घेण्यात आले आहे.

आरोग्य सखी प्रकल्पा अंतर्गत द्वितीय वर्षात झालेले विशेष काम –

**१. लव्ही गाव –** कोरोना संदर्भातील जाणीव–जागृती सत्रे घेण्यासाठी येथील अंगणवाडीताई तेजस्विनी रेणुसे या तयार झाल्या. या निमित्ताने या गावात आपला महिलांसाठीच्या कामासाठी नव्याने संपर्क झाला.

**२. कोदापूर गाव –** चापेट धरण बांधणीच्या वेळी हे गाव स्थलांतरित होऊन नव्याने वसविले गेले. येथील रंजना देवगिरीकर या आपल्या स्थानिक कार्यकर्त्या आहेत. आरोग्य सखी प्रकल्पातील सर्व जाणीव–जागृती सत्रे त्यांच्या गावात होतील यासाठी त्या नेहमी धडपडत असतात. शिक्षिका असल्यामुळे जाणीव पूर्वक त्या–त्या आजाराने ग्रस्त महिलांना त्या विषयाच्या सत्राला, आरोग्य तपासणीला आवर्जून त्या घेऊन येतात. आपल्या गावातील जास्तीत जास्त महिलांना या प्रकल्पाचा उपयोग व्हावा, यासाठी त्या विशेष प्रयत्न करतात.

**आरोग्य सखी ॲप –** प्रकल्पातील स्थानिक कार्यकर्त्यांनी केलेल्या कामाचा अहवाल कमीत कमी वेळात पुणे कार्यालयापर्यंत पोहोचावा व संकलित व्हावा ज्यामुळे कामावर दूरस्थ पद्धतीने देखरेख करता येईल यासाठी हे मोबाईलवर वापरता येईल असे ॲप तयार करून घेण्यात आले आहे. सध्या ३५ कार्यकर्त्या याचा नियमित वापर करतात.

## टेलिमेडिसीन

रोटरी क्लब ऑफ पुणे प्राईड यांच्या मदतीने अरोग्य क्षेत्रातील टेलिमेडिसीन हा दुसरा प्रकल्प चालू आहे. दर महिन्याच्या १२ तारखेला प्रकल्प नियोजनाची बैठक आंबवण्यामध्ये घेण्यात येते. आशा सेविकांबरोबर नियोजनाच्या वर्षभरात १० बैठकी झाल्या. त्यात गाववार तपासणींसाठीचे नियोजन करून त्याप्रमाणे तपासण्या करण्यात आल्या. अकरा आशांनी मिळून ४२ गावांमध्ये २,२६५ लोकांच्या तपासण्या केल्या.



**९ जानेवारी रक्तदान शिबिर :** टेलिमेडिसीन प्रकल्पाअंतर्गत महिलांचा सहभाग असणारे रक्तदान शिबिर वेल्हे तालुक्यात आयोजित केले होते. १२.५ पेक्षा जास्त हिमोग्लोबीन असणाऱ्या १६८ लोकांची ३५ गावांतून नाव नोंदणी झाली व ४७ लोकांनी प्रत्यक्षात रक्तदान केले. त्यामध्ये १९ महिला व २८ पुरुष होते. या १९ महिलांनी पहिल्यांदाच रक्तदान केले. ११ आशा सेविकांनी २५ गावांमध्ये जाऊन रक्तदानाची माहिती सांगितली होती. अनेक महिलांचे वजन ४५ किलो पेक्षा कमी असल्याने त्या रक्तदान करू शकल्या नाहीत. कार्यक्रमाला प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉक्टर करपे पूर्णवेळ होत्या. त्यांनीही रक्तदान केले. रोटरीचे पदाधिकारी पूर्णवेळ कार्यक्रमास होते. तालुक्यातील जिल्हा परिषद

सदस्य अमोलदादा नलावडे यांनीही या कार्यक्रमाला उपस्थिती लावून रक्तदान केले. रोटरी क्लब ऑफ पुणे प्राईडने कार्यक्रमाला अर्थसाहाय्य दिले. गावोगावी काम करणाऱ्या आरोग्य आशा सेविकांनी नेमके निरोप दिल्यामुळे रक्तदान शिबिर यशस्वी झाले!!



## सकस आहार प्रकल्प

**रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथ –सोयाबीन दूध वाटप :**

१७ मार्च २०२१ रोजी करंजावणे प्राथमिक आरोग्य केंद्र येथे सोयादूध सकस आहार या योजनेची सुरुवात झाली. त्यावेळी मार्गासनी, आडवली, अस्कवडी, खांबवडी गावातील ३ ते ६ वयोगटातील अंगणवाडीच्या ९३ मुलांची आरोग्य तपासणी झाली. त्यासाठी डॉ. बागेश्री देवकर, वैद्य मेधा देवळेकर, डॉ. रेणुकुमार आले होते, तसेच रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथचे प्रेसिडेंट सुदर्शन नातू आणि ७ रोटेरियन उपस्थित होते. सर्व मुलांना सोयाबीन दूध व लस्सी देऊन उद्‌घाटन करण्यात आले. या १०० मुलांसाठी १७ मार्च पासून पुढे १०० दिवस रोज सोयाबीन दूध देण्यात येणार आहे. सोयाबीन पासून दूध त्यापासून ताक, दही, लस्सी व पनीर बनवण्याचे प्रशिक्षण चार गावांतील ३५ महिलांनी घेतले.

## बालवाडी

जून २०२० पासून शैक्षणिक वर्षात आपल्या एकूण पाच बालवाड्या सुरू होत्या. यामध्ये एकसष्ठ मुलांनी प्रवेश घेतला होता. कोविडचा वाढता प्रादुर्भाव झाल्यामुळे प्रत्यक्ष वर्ग सुरू झाले नाहीत. बालवाडीताई गावपातळी वरील पालक संपर्कात होत्या. मुलांकडून काही गृहपाठ करून घ्यावेत असे ठरले. मुलांच्या इंद्रिय विकासावर आधारित हे गृहपाठ होते. साधारण जानेवारी–फेब्रुवारी हे दोन महिने प्रत्यक्ष बालवाडी झाली. २६ जानेवारी साजरी करण्यात आली. मुलांच्या सहलीचे आयोजन करण्यात आले होते. लहान मुलांना सुद्धा हात धुणे तसेच मास्कचा वापर करणे यावर माहितीचे सत्र झाले.

## नवचैतन्य दल

गाव पातळीवर २४ गावांत ३० गटांमध्ये दल चालू आहे. या पैकी पंधरा गावे आरोग्य सखी प्रकल्पातील तर शिवापूर भागात सहा गावांमध्ये आणि पासली विभागात आठ गावांमध्ये स्वतंत्रपणे दल चालू आहे. या ३० गटांमध्ये साधारण ३७५ मुले सहभागी होतात. दले घेणाऱ्या २८ आणि सात मार्गदर्शिका असा ३५ जणींचा गट हे काम करतो आहे.

**बाल मेळावे :** १४ नोव्हेंबरला बाल दिनानिमित्त गाव पातळीवर बाल मेळावे झाले. सात गावांतून २७० मुलांसाठी हे मेळावे घेतले. यावेळी चित्रकला स्पर्धा, खेळाच्या स्पर्धा आणि मुलांनी गॅसचा वापर न करता स्वतः बनवलेले खाद्यपदार्थ असे स्पर्धेचे विषय होते. असे ४५ खाद्यपदार्थ मुलांनी बनवले होते. हे सगळे काम सोळा कार्यकर्त्यांच्या मदतीने झाले.

**पालक भेटी :** दलाच्या कामातील सातत्य, मुलांचा नियमित सहभाग व इतर शारीरिक प्रश्न असे विषय डोळ्यांसमोर ठेवून पालक भेटीचे नियोजन केले जाते. मार्गदर्शक अशा भेटींच्या माध्यमातून स्वतः पालक प्रतिक्रियांचे व्हिडीओ तयार करतात. तसेच जानेवारी–फेब्रुवारी महिन्यात सूर्यनमस्कार सप्ताह साजरा केला गेला.

## हिरकणी

हिरकणी हा ० ते ६ वयोगटातील मुले आणि त्यांच्या आई यांच्यासाठी काम करणारा हा गट आहे. यात सध्या दहा गावांतील सोळा जणी काम करतात. नोव्हेंबर २० पासून १० गावांमधून हिरकणी सत्रे सुरु झाली. एकूण ११० हिरकणी माता या सत्रांना येतात. १५ जणांचा प्रशिक्षित गट यासाठी काम करतो. कोविड प्रादुर्भाव असला तरी सत्रातील महिलांची उपस्थिती व सत्रासाठीचा प्रतिसाद चांगला होता.

**हिरकणी मार्गदशन :** पुण्यातील प्रसिद्ध बालारोगतज्ज्ञ डॉक्टर पडळकर यांचे ऑनलाइन मार्गदर्शन या गटासाठी मिळाले. तसेच वेगवेगळ्या गावातील संपर्क वाढला. हिरकणी गटांपैकी ७ मार्गदर्शकांनी गरवारे बालभवनचे ऑगस्ट महिन्यातील ५ दिवसांचे ऑनलाईन प्रशिक्षण पूर्ण केले.

**आधुनिक नवरात्र : ३ ते १२ जानेवारी २०२१**

अ. स्त्री शक्ती प्रबोधनाच्या निमित्ताने ऑनलाईन परिसंवाद घेण्यात आला. या परिसंवादात तृप्तीताई यांनी हिरकणीच्या कामावर, आशाताई यांनी एकल महिलांच्या कामावरचा अभ्यास मांडला. वंदनाताई यांनी मानसिक आरोग्य आणि मासिक पाळी या विषयावर केलेले काम मांडले. आपल्या विभागाची एकूण चार सादरीकरणे या परिसंवादात झाली.

आ. आपल्या भागातल्या किशोरी व महिला यांची एकत्र सहल राजगडावर अश्विनीताई व आशाताई यांनी काढली. महिलांनी असे गड बघायचे हे तिसरे वर्ष आहे!

इ. या आधुनिक नवरात्रा निमिताने १५ दिवसांच्या कालावधीत सर्व गटाने मिळून १०,००० सूर्यनमस्कार घालायचे ठरवले व तसे घातलेही. अगदी तीन वर्षाच्या बालिके पासून तिच्या नऊवारीतल्या आजीच्या वयाच्या महिलांचा त्यात सहभाग होता हे विशेष!

## सहनिवास

जास्वंद गिरीकन्या निवास वेल्हे येथे सुरू होऊन सात वर्षं झाली. यावर्षी कोरोना महामारीमुळे शाळा बंद असल्याने प्रत्यक्ष वसतिगृह दोनच महिने चालले. निवासात नवीन प्रवेशही फारसे घेतले गेले नाहीत. दहावी व बारावीसाठी ऑनलाईन तासिका व शाळेच्या गटावर अभ्यास दिला जायचा. मात्र निवासातील मुलींना राहण्यास परवानगी नसल्यामुळे जून महिन्यात त्यांना बोलावले नाही. शाळेतील प्राचार्य व शिक्षक यांनी निवासाला भेट दिली. गणपती उत्सवानंतर मुलींना शाळेत येण्यासाठी निरोप द्या, असे सांगितले. त्यामुळे नववी- दहावी-बारावी पर्यंतच्या मुली निवासात आल्या. मुलींची दररोज दोन तास शाळा सुरू झाली. शासनाचे सर्व नियम पाळून मुली शाळेत जाऊ लागल्या. निवासात २३ मुली व चार ताई अशा राहात होत्या.

मुलींना ऑनलाइन अभ्यासासाठी डॉक्टर सौ. कानेटकर यांच्या आर्थिक मदतीतून दोन नवीन टॅब व तीन मोबाईल देण्यात आले. दहावीच्या मुलींसाठी निवेदिताताईने गणित विषयावर नऊ महिन्यांमध्ये १०७ तासिका ऑनलाइन घेतल्या. मोबाईलमुळे मुलींचा अभ्यास चांगला होऊ शकला. या सर्व मुलींच्या घरी रेंज नसल्यामुळे त्यांचा अभ्यास झाला नसता.

निवासात मुलींचे गटांमध्ये पुस्तक वाचनही सुरू केले. खरेखुरे आयडॉल्स या पुस्तकामध्ये दररोज एका व्यक्तीचे अनुभव चर्चा करून त्यावर एकमेकींचे विचारही जाणून घेतले जायचे. मुलींचे या पुस्तकाचे दोन भाग वाचून पूर्ण झाले.

मुलींची दोन वेळा हिमोग्लोबीन तपासणी करण्यात आली. ११ सप्टेंबर रोजी तपासणी केल्यावर सात मुलींचे हिमोग्लोबीन कमी आढळले. त्यांच्या आहारात शेंगदाणा लाडू, राजगिरा लाडू असे दिले गेल्यावर तीन महिन्यांनी त्यांचे हीमोग्लोबीन वाढले.

यावर्षी दहावी-अकरावीत गेलेल्या दोन मुलींना नवीन प्रवेश दिला. दहावीच्या तासिकांसाठी गावातील तीन मुली तीन महिन्यांसाठी निवासी आल्या होत्या.

२२ फेब्रुवारीला परांजपे प्रतिष्ठानच्या दोन विश्वस्तांची २३ मुलींसोबत ऑनलाईन बैठक झाली. अशाप्रकारे पहिल्यांदाच झूम मीटिंगद्वारे मुली बोलल्या.

दहावीच्या मुलींच्या ऑनलाईन तासिका झाल्या. सहनिवासातील अनेकजणींनी कोरोना काळात वस्तीवर जाऊन करोना जाणीव-जागृती प्रकल्पाबद्दल माहिती सांगितली.

## युवती

**जास्वंद वर्ग :** युवतींसाठी चालणारे हे वर्ग कोदवडी व वेल्हे गावात घेण्यात आले. कोरोनामुळे काही मर्यादा येऊनही वर्ग झाले. ७ डिसेंबर पासून




कोदवडी गावाला तर २८ डिसेंबर पासून वेल्ह्यामध्ये वर्ग सुरू झाले. कोदवडीला चार गावांतून २५ जणी तर वेल्ह्याला सहा गावांतून २२ युवती अशा एकूण ४७ जणींचे प्रशिक्षण या वर्गात झाले. युवतींनी स्वयंपूर्ण व्हावे म्हणून त्यांना ६-७ प्रकारची उत्पादक कौशल्ये शिकवण्यात आली. त्यात दोऱ्याचे ग्रीटिंग/फ्रेम, क्रोशाचे लोकर काम, ओरिगामी, क्विलिंगचे दागिने असे शिकवले. याशिवाय शिवण कला अगदी प्राथमिक गोष्टींपासून शिकवले. काजे-बटण करणे, हूक-लूक लावणे, हात शिलाई करणे पासून मशीन चालवायला शिकवले. कापडावर सरळ टिप मारून पिशवी शिवता येणे, मास्क शिवणे या तयारी पासून साधे ब्लाऊज, कटोरी ब्लाऊज असेही स्थानिक काम मिळवून देणारे कौशल्य शिकवले.

युवतींचे वर्ग चालू असताना वर्गातच हिमोग्लोबीन तपासणी केली व हिमोग्लोबीनचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांना महिलांसंबंधीत कायद्यांची माहिती सुद्धा दिली. कौटुंबिक हिंसाचाराविषयी माहितीही दिली. या शिवाय त्यांचे संवाद कौशल्य सुधारण्यासाठी स्थानिक पुढाऱ्यांना भेटून गावाची माहिती गोळा करायला सांगितली.

या निमिताने युवतींनी स्वतःबद्दल जागरूक व्हावे, त्यांना सामाजिक भान यावे यासाठी सत्रांचे नियोजन केले होते. अमेरिकेतील ज्योत्स्नाताई खांडेकरांनी या वर्गासाठी अर्थसाहाय्य दिले.

**चिंतन गट बैठक :** मध्यवर्ती प्रबोधिनीच्या गटाशी जोडणी करणारी युवाशक्ती चिंतन गट बैठक वेल्ह्याला झाली. अकरा युवती प्रत्यक्ष व तीन युवती झूम वरून सहभागी झाल्या होत्या. प्रकल्प कालावधीत युवाशक्ती कार्य दिशा गट करण्यासाठी बैठक घेऊन युवती व हिरकणी मिळून ६९ जणींची यादी तयार केली.

**मेळावा:** वेल्ह्यात युवती संघटन मेळावा झाला. त्याला ७१ युवती व सात ताई अशा एकूण ७८ जणी होत्या. हा मेळावा प्रबोधिनीच्या १८ ते ३० वयोगटातल्या नियमित संपर्कातल्या गटाचा होता. गौरीताई कापरे यांचे अनुभवकथन व मार्गदर्शन छान झाले. या वेळी दोन महिने हराळीला काम करणारी सुनीता परत आली. आंबवणे गावातील एका स्थानिक कार्यकर्तीचा कोविद १९ योद्धा म्हणून सत्कार झाला.



**वास्तूचे भूमीपूजन :** आता स्व.लिलनताई तांबे शैक्षणिक संकुलामध्ये स्वतंत्र सहनिवासाची योजना आखली आहे. ८ मार्च २०२१ रोजी वेल्ह्याला स्व. लिलनताई तांबे शैक्षणिक संकुल व त्या अंतर्गत येणाऱ्या युवतींच्या सहनिवासाचे भूमिपूजन झाले. प्रत्यक्ष भूमिपूजन स्थानिक कार्यकर्त्या द्वारकाताई व त्यांचे यजमान निवृती वालगुडे यांनी केले. प्रबोधिनीचे

संचालक डॉ. गिरीशराव बापट, कार्यवाह सुभाषराव देशपांडे व नियमित काम करणारे २०-२५ कार्यकर्ते उपस्थित होते. यासाठी भरीव देणगी देणारे श्री. व सौ. चंद्रशेखर देसाई परिचितांसह उपस्थित होते. यांच्या आशीर्वादाने भूमिपूजनाचा छोटेखानी कार्यक्रम पार पडला. या भूमिपूजना निमित्ताने एक पुढचे पाऊल!

## नवदिशा प्रकल्प

नवदिशा प्रकल्प ग्रामीण महिलांमध्ये नेतृत्वगुण निर्माण व्हावे यासाठी सुरु केला. आंबवणे परिसरातील २५ गावांमधील २५ जणी आणि वेल्हे आणि पुढील दुर्गम भागातील २५ जणी अशा ५० जणींसाठी हा प्रकल्प आहे. विविध प्रकारच्या अनुभवांच्या आधारे या महिलांमधील नेतृत्वगुणांची वाढ व्हावी आणि त्यांनी त्यांच्या गावातील प्रश्न सोडवण्यासाठी पुढे यावे हे त्यातील अंतिम असे उद्दिष्ट आहे. वृत्तकाळात पुढील गोष्टी या गटाबरोबर आपण केल्या. 'स्व' ची जाणीव हे पहिले सत्र, स्वतःला ओळखण्याचे सत्र होते. ज्ञान प्रबोधिनीच्या प्रज्ञा मानस विभागातील तज्ज्ञ डॉ. वनितातार्इ पटवर्धन यांनी हे सत्र घेतले. कोणतीही गोष्ट करायला घेण्यापूर्वी आपण आपला स्वतःचा विचार केलेला असला पाहिजे. आपल्या क्षमता, कौशल्ये आणि मनाच्या स्थितीबद्दल जाणून घेतले पाहिजे. त्यांच्या या सत्रामुळे महिलांना कोणत्या गोष्टीला किती महत्त्व द्यायचे, एकूण परिस्थितीच्या प्रकाशात एखाद्या विशिष्ट गोष्टीला कसे पाहायचे, किती महत्त्व द्यायचे हे समजले. ५३ महिला या सत्रात सहभागी झाल्या होत्या. या पासून प्रकल्पाला सुरुवात झाली. कक्षा रुंदाव्यात म्हणून गटाची गणपतीपुळे येथे सहल काढली. सहलीत ३४ गावांतील ३६ महिला सहभागी झाल्या होत्या. ३६ जणींपैकी सहा जणींनी पहिल्यांदाच समुद्र पाहिला. तर आठ जणी प्रथमच बोटीत बसल्या. या महिलांनी जबाबदारीने आरोग्य सखी प्रकल्पातील गावपातळी वरील कामाची जबाबदारी घेतली. आरोग्य विमा हा महत्त्वाचा विषय समजावून घेतला. २८ जणींना या गोष्टीचे महत्त्व पटून त्यांनी स्वतःच्या आरोग्याचा विमा काढला हे महत्त्वाचे! गावात महिलांना सॅनिटरी नॅपकीन विषयी माहिती सांगितली. शिवाय, मोठ्या माणसांमध्ये सुद्धा जंत हा त्रासाचा विषय असू शकतो, या जाणीव-जागृतीच्या प्रचारात हा गट सहभागी झाला. बैठकीतील प्रशिक्षणात मानसिक आरोग्य कशा-कशा वर अवलंबून असते, मानसिक आरोग्य म्हणजे काय, ते व्यवस्थित ठेवायचे म्हणजे काय करायचे, मानसिक आरोग्य बिघडले असे वाटले तर कोणाची तरी मदतही घ्यावी लागते, याचीही माहिती घेतली. अशा प्रकारे कोरोना काळातही गाव- पातळीवरच्या प्रश्नांसाठी यांनी कृतीरूप काम केले.

## कातकरी विकास प्रकल्प

**नियमित सत्रे :** चार वस्त्यांवर मिळून एकूण ८३ सत्रे झाली. यामध्ये मुलांना अभ्यासाची गोडी लागावी म्हणून अभ्यासाला पूरक सत्रे, शारीरिक स्वच्छतेचे व परिसर स्वच्छतेचे महत्त्व शिकवणारी सत्रे, मैदानी खेळ यांचा समावेश होतो. याशिवाय वस्तीवरील मुलांसाठी प्रथमच स्नेहसंमेलन कार्यक्रम, वनभोजन, मकर संक्रांत कार्यक्रम यासारख्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. मुलांनी व पालकांनी प्रथमच असा अनुभव घेतला. कोंढवली, मालवली व धानेप या तीन वस्त्यांवरील शाळेत जाणाऱ्या पहिली ते दहावीच्या २९ मुला-मुलींना दप्तर, स्टेशनरी साहित्य तसेच कपडे वाटप करण्यात आले. वेल्हयातील तीन महिने कालावधी असणाऱ्या जास्वंद वर्गात वस्तीवरील पाच जणी सहभागी झाल्या.

कोंढवली व मालवली वस्त्यांवरील एकूण १९ लहान मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. वेल्हे तालुक्यातील १२ वस्त्यांवर कोरोना जाणीव-जागृती सत्रे घेण्यात आली. तसेच ८२ कुटुंबांना सॅनिटायझर व ४११ जणांना मास्क वाटप करण्यात आले. २३ कुटुंबांना धान्य व शिधा वाटप करून कोरोनाच्या काळात गरजेच्या वेळी मदत करता आली.



**आधार कार्ड मेळावा :** आपल्या प्रयत्नांमधून प्रथमच वेल्हे येथील तहसीलदारांनी कार्यालयाबाहेर आधार कार्ड मशीन नेऊन आधार कार्ड काढण्यास परवानगी दिली. असे आधार कार्ड काढण्याचे शिबिर वस्तीवर घेण्यात आले. या शिबिराच्या माध्यमातून आठ वस्त्यांवरील एकूण ६० जणांचे आधार कार्ड काढून झाले. यानिमित्ताने कातकर्यांच्या अस्तित्त्वाचा पुरावा तयार झाला. ज्याचा उपयोग पुढे अनेक सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांना होणार आहे.

प्रबोधिनीचे संचालक मा. गिरीशराव बापट व विभाग प्रमुख मा. सुवर्णाताई गोखले यांनी वस्तीला भेट देऊन वस्तीवरील सर्व मुलांशी व लोकांशी गप्पा मारल्या.

### विशेष! ८ मार्च जागतिक महिला दिना निमिताने

१. We are one या संस्थेकडून सॅनिटरी पॅड देणगी : मुंबईच्या We are one या संस्थेकडून ६०,०००/- रुपयांचे सॅनिटरी पॅड देणगी मिळाले. हातवे येथे वाटप कार्यक्रम केला. त्यात सहा गावातील ५० महिला व किशोरी मुलींना पॅडचे वाटप करण्यात आले. मुली व महिलांना सॅनिटरी पॅड वापराची माहिती देण्यात आली. हडपसर येथून काही संस्था प्रतिनिधी कार्यक्रमाला आल्या होत्या.

२. प्रयास युवा फाऊंडेशन या पिंपरी-चिंचवड येथील संस्थेतून पाच युवक व आठ युवती असे तेरा जण आले होते. युवतींपैकी आयुर्वेदिक डॉक्टर ऋतुजा हिने मुलींना मासिक पाळी विषयी तपशीलवार व खूप छान मार्गदर्शन केले. मंजाई आसनी येथे जास्वंद वर्गातील १८ युवती व २० महिला कार्यक्रमाला उपस्थित होत्या. त्यांनी बायोडिग्रेडेबल सॅनिटरी पॅडचे वाटप केले.

३. माधुरी केळकर यांच्या 'श्रीया' या योग वर्गामध्ये ग्रामीण महिला सबलीकरण कामाचे e-अनुभव कथन केले.

तसेच वस्तीवर काम करणाऱ्या गटाचे कामाचे स्वरूप, काम करत असतानाचे अनुभव जाणून घेतले.

**स्नेहसंमेलन कार्यक्रम :** वस्तीवरील मुलांमध्ये असलेल्या कला–गुणांना वाव देणे व स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे यासाठी ६ फेब्रुवारी रोजी मालवली येथील वस्तीवर स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यामध्ये पालक व मुलांचा सहभाग आणि प्रतिसाद हा अतिशय उत्तम होता. स्वत:च्या भाषेतील व पारंपरिक पद्धतीने कोंढवली व मालवली वस्तीवरील २५ मुलींनी उत्स्फूर्तपणे नृत्य सादर केले. या सर्वांच्या सहकार्यातून व सहभागातून वस्तीवर पहिल्यांदाच केलेला स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. कार्यक्रमानंतर सहभागाचे बक्षिस म्हणून पर्स देण्यात आल्या.

**महत्त्वाचे :**

१) लॉकडाऊनमध्ये बजाज कोविड रिलीफ प्रकल्पांतर्गत वस्तीवरील मंगलताई वाघमारे यांनी मोबाईलचा व नेटचा पहिल्यांदाच वापर करून कोरोना जाणीव–जागृतीचे २० जणांचे गुगल फॉर्म भरण्याचे काम केले.

२) आधार कार्ड मेळाव्याची पूर्वतयारी करण्यासाठी तसेच वस्त्यांवर निरोप देण्याचे काम वस्तीवरील दोन दादांनी चांगल्या प्रकारे सहभागी होऊन पूर्ण केले.

३) वस्तीवरील इयत्ता पाचवीमध्ये शिकत असणारी दिक्षा वाघमारे हिने वेल्हयातील निवासात प्रवेश घेतला.

४) कातकरी प्रकल्पात काम करत असणाऱ्या दोन युवती वस्तीवरील ताईंच्या घरी हक्काने मुक्कामी जाऊ शकल्या.

## एकल महिला

**एकल महिलांसाठी काम :** या कामाचे हे सहावे वर्ष! नवरा गेल्यानंतर कुटुंब प्रमुख म्हणून घरची सगळी जबाबदारी तिच्यावर येते. अचानकपणे अशी परिस्थिती उद्‌भवते त्या वेळी तिची मन:स्थिती अत्यंत नाजुक होऊन जाते. अशा वेळी तिला काय अडचणी येतात, कुटुंब प्रमुख म्हणून कुठल्या गोष्टीची गरज आहे हे कळावे म्हणून आपण त्यांच्याशी संवाद वाढवला.

**आर्थिक मदत :** संजय गांधी निराधार योजनेचे ११०० रु. द.म. मिळण्यासाठी आपण या वर्षी सहा जणींना मदत केली. कुटुंब आधार योजनेचे २०,००० रु. एका महिलेला मिळवून दिले. तसेच श्रावण बाळ योजनेसाठी सहा महिलांची कागदपत्रे दाखल केली आहेत.

गेल्या वर्षीच्या मेळाव्यातून ज्या महिलांच्या अडचणी पुढे आल्या व त्यापैकी ज्यांना काही करण्याची इच्छा आहे अशा नऊ महिलांना संस्थेतून १,४७,०००/रु. अर्थसाहाय्य देऊन मदत केली आहे. त्यातून त्यांनी शेळीपालन, म्हैस, गाय, कुकुटपालन, फॉलपिको मशीन घेऊन आपले उत्पादन वाढीसाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

**मेळावा :** २७ मार्च रोजी वेल्हे येथे एकल महिला मेळावा झाला. त्याला २६ गावांतून ६० एकल महिला आल्या होत्या. ग्रामीण स्त्री शक्तीचा काम करणारा सगळाच गट महिलांचा आहे म्हणून... आणि या गटात असणाऱ्या अनेक जणी सन्मानाने जगताना पाहून, त्या विश्वासाने हा प्रतिसाद हळूहळू वाढतो आहे, असे लक्षात आले. वेल्ह्याच्या मेळाव्याला तहसील कचेरीत याच विषयावर काम करणारे शासकीय अधिकारी चव्हाण सर आले होते. त्यांनी स्वतः सर्व योजनांची माहिती सांगितली व मदतीचे आश्वासन दिले.

**एकल महिलेचे अस्तित्व :** पुन्हा एकदा लक्षात आले की योजनेच्या लाभार्थी होण्यासाठी या महिलांना ‘अस्तित्वात’ यावे लागेल. नवऱ्याने ‘असेच सोडून दिलेली’कडे ना असते आधार ना ‘ती’चे असते रेशनकार्डवर नाव!.... मग ‘ती’चे अस्तित्व सिद्ध करणे हे पहिले काम असते.....

कधी एखाद्या विधवेचे नाव रेशनकार्डवर पोरं झाल्यामुळे असतेही पण शासकीय एकल योजनेचे पेन्शन मिळण्यासाठी तिचे व असल्यास मुलांचे वेगळे रेशनकार्ड असणे गरजेचे असते. .... पण या पुरुषप्रधान समाजात ‘माझे वेगळे कार्ड काढून द्या म्हणायची हिंमतच विधवेकडे नसते’ ... मग घरच्यांना पटवायला कार्यकर्त्यांचे संवाद कौशल्य पणाला लावावे लागते.

**योजनेसाठी महिलेला पात्र बनवण्यास मदत करणे:** मेळाव्यात आलेल्या प्रत्येकीसाठी काहीतरी मदत करावी लागणार आहे. या मेळाव्यात आलेल्या महिलांनाही रेशनिंग कार्ड काढून देणे, आधार कार्ड काढणे व त्या ज्या योजनेच्या लाभार्थी होतील तशी कागदपत्रे गोळा करून देणे आवश्यक आहे. त्याशिवाय पात्र लाभार्थी तयार होत नाही!

या विषयाला सुरुवात केल्यावर आपल्या कार्यक्षेत्रातील ४५० पेक्षा जास्त एकल महिलांची प्राथमिक माहिती गोळा झाली. अशा बऱ्याच एकल महिला आहेत की ज्यांचे वय लहान आहे, पदरात २/३ मुलं आहेत, लक्ष देणारे कोणी नाही, शिक्षण आहे पण नोकरी नाही कारण नोकरी करायची तर मुले कोण संभाळणार, असे मुद्दे मेळाव्याच्या निमित्ताने लक्षात आले. आता यासाठी त्यांच्या कलाने नव्याने कामाला सुरुवात करावी लागणार आहे.

## ज्वाला प्रकल्प

वेल्हे खुर्द येथे मार्च महिन्यापासून ज्वाला प्रकल्प सुरू झाला. त्यासाठी गावातील महिला–पुरुष यांची एकत्र बैठक घेतली. या बैठकीत आधुनिक चूल प्रात्यक्षिक दाखवले व चुलीसाठी एक महिना लागणारे इंधन प्रत्येकासाठी उपलब्ध करून दिले. जे लोक रुपये पाचशे देऊन खरेदी करतील त्यांच्यासाठी ही व्यवस्था केली गेलेली आहे.

## वंचितांसाठी काम : आर्थिक मदत

एका देणगीदारांनी त्यांना साठ वर्षं पूर्ण झाली त्या निमित्ताने देणगी दिली. त्यातून अतिशय गरजू ६० महिलांना प्रत्येकी रु. १०००/– द्यावेत अशी कल्पना मांडली. गरजू महिलांनी हे पैसे कसेही खर्च करावेत पण कसे केले/करणार ते सांगावे!

‘गरजू’ कशी ओळखायची याचे निकष ठरवण्यासाठी गटाने वेगळ्या प्रकारे विचार करायला सुरुवात केली! जिच्या घरी विजेचे बिल येत नाही (म्हणजे वीजेचे कनेक्शन नाही), जी चुलीवर स्वयंपाक करते अशी महिला गरजू असे ठरवले! ६० जणींची यादी बनवली.

फक्त पैसे वाटप करायचे होते .....होऊन जाईल पटकन... असं वाटलं पण तीन महिने लागले! कारण या यादीतल्या बहुतेक जणी गावापासून दूर, डोंगरावर रहाणाऱ्या होत्या. त्यांच्याशी संपर्क करायचे काही साधनच नव्हते! तरी ठरवलेल्या प्रत्येकीला गाठले... रक्कम दिली. तेव्हा लक्षात आले की या ६० जणींपैकी साधारण २५ जणींच्या घरापर्यंत जायला २०२१ साली रस्ताही नव्हता! रक्कम वाटप केली. रक्कम खर्च करण्याबाबतीत कोणी सांगितले की किराणा दुकानदाराचे थकलेलं बिल भरू शकीन, तर कोणी सांगितले नातवंडांना खाऊ आणणार, कोण म्हणाली आईकडे माहेरपणाला जाऊन येईन...तर कोण म्हणाली पायात घालायला चांदीच्या पट्ट्या करीन! असे मनातले करून त्या अचानक मिळालेल्या पैशाचा आनंद मिळवणार होत्या!

## ❖ भाजी-विक्री, एक मदतकार्य ! ❖

आभाळात मान्सून पूर्व ढग दाटून आले आणि सोसाट्याचा वारा आला. दोन दिवस उन्हाने तापलेल्या वातावरणात एकदम सुखकर फरक पडला. तेवढ्यात कावेरीताईंचा फोन आला, 'ताई पाऊस येणार असे दिसतंय! नुकताच काढलेला कांदा शेतात चांगला वाळला आहे. **पावसाने भिजला तर आज २०-२५ रुपयाने जाणाऱ्या कांद्याला किलोला २ रुपये सुद्धा मिळणार नाही!** काही तरी करा आणि कांदा लवकर म्हणजे उद्याच विकता येईल असे बघा!' मी नेमकी अडचण समजावी म्हणून विचारले की 'किती आहे?' त्या म्हणाल्या, 'फार नाही ५० किलोची १०० पोती तरी भरतील!' .... **एकीला मदत करायची तर ५००० किलो... ५००० किलोचा नुसता विचारही मला झेपेना** . पण काहीतरी केलं पाहिजे असं वाटलं. कावेरीताईंनी मला एकटीला नाही तर अनेक ताईंना फोन केले होते. सगळ्यांनी एकत्र बोलून मदत करायचे ठरवले!

गटातल्या वंदनाताईंनी पुढाकार घेतला. एरवी त्रास वाटणारी प्रसार माध्यमे या वेळी कामी आली आणि कांदे विक्रीचा निरोप झपाट्याने फिरला. पुण्यात ३५ रुपये किलो कांदे मिळत असताना गावात १० रु. ने विकला जात होता. म्हणून १८ रु. किलो असा विक्रीचा भाव ठरवला पण किमान ५ किलो तरी घ्यायचा असं ठरवलं. **म्हणता-म्हणता १००० किलोच्या ऑर्डर बुक झाल्या** आणि दुसऱ्या दिवशी वाटप करायचे ठरवून कावेरीताईंची मुले छोटा टेम्पो घेऊन पुण्यात आलीही. वंदनाताईंनी कुठून कसं जायचे हे सांगितले आणि ग्राहकांना कुठे थांबा हेही सांगितले. तसे घडले आणि कांदा बघून लोकांनी 'अजून द्या', 'अजून द्या' अशी मागणी केली. ती अर्थातच पूर्णही झाली आणि **व्हॉटसअॅप कृपेने एका दिवसात १५०० किलो कांदा विकला गेला.**

लॉकडाऊनमुळे सगळे घरात होते. रोजचे भाजीवाले येत नव्हते, त्यामुळे कांदा विक्रीला उदंड प्रतिसाद मिळाला. घेणारा आणि विकणारा दोघेही खूश झाले. घेणाऱ्याची गरज भागताना कमी दरात कांदा मिळाला. शेतकऱ्याला मदत झाली असे समाधान मिळाले, तर विकणाऱ्याला चार पैसे जास्त मिळाले. कटकट न करता समाधानाने कांदे घेणारे ग्राहक मिळाले, रोख पैसे लगेच हातात आले. पाऊस लागायच्या आत कांद्याचे पैसे झाले. सगळा खर्च निघाल्याचे समाधान हे त्या सोबत मिळाले!

संध्याकाळी कावेरीताईंचा फोन आला, 'ताई, कांदा करताना झालेला सर्व खर्च भरून आला. कालच्या फेरीत मुलांनी काही कांदा हॉटेलला विकला, काही भाजीवाल्यांनी ऑर्डर दिल्या. उद्या पुन्हा फेरी केली की संपेल सारं. बरं वाटलं. लोकांनी कांदा घेतला तेव्हा कोणी जेवण दिले तर कोणी उन्हाचे गार पाणी दिले, तर कोणी सरबत भरून बाटली दिली... **सन्मानाने विक्री झाली!** फार बरं वाटलं. कांद्यामुळे नवीन कर्ज होणार नाही... आधीच लॉकडाऊन, त्याला चांगला आधार मिळाला!' एरवी वर्तमान पत्रात बातमी वाचतो 'अवकाळी पावसाने शेतकऱ्याचे नुकसान' म्हणजे काय हे कांदा घेणाऱ्या प्रत्येकाला थोडं तरी कळलं! ....प्रश्न सगळ्यांना होता. आत्ता कुठे एकीचा प्रश्न मार्गी लागला!

तो पर्यंत प्रबोधिनीने कांदा विकला ही 'बातमी' पुण्यात आणि बचत गट घेत आहोत त्या गावात पसरली. मग काय भारतीताईंना फोन आले, **'ताई आमची भाजी विकायची आहे. बाजार बंद आहेत म्हणून शेतात गुरं सोडायची का? असा प्रश्न आहे. देऊ का पाठवून?'** आशाताईंना फळवाले म्हणाले, आमचे अंजीर, चिक्कू पण घ्याकी.... **घेत असलात तरच तोडा करतो नाहीतर पक्षी येतीलच की**....मग



कार्यकर्त्यांना स्वस्थ बसवेना, आशाताई म्हणाल्या मीच जाते कांद्याच्या टेम्पोत भाजी-फळे घेऊन .... तोवर भारतीताईंनी एका अपार्टमेंटमध्ये स्टॉल ठरवला आणि एका दिवशी दोन गाड्या भाजी, कांदे घेऊन निघाले. एक स्टॉल लागला त्यावर फक्त भाजीच विकली. सोसायटीतल्या पदाधिकाऱ्यांनी वजन करायला सुद्धा मदत केली. तर कांद्याचा टेम्पो आज भाजी घेऊन मागणी पुरवत पुणेभर फिरला, त्याने ४०० किलो पेक्षा जास्त विक्री केली. सकाळी ७ वाजता निघालेली गाडी शेवटची भाजी रात्री ९.३० वाजता देऊन गावी परतली. दिवस भरात एकूण **५५६ किलो भाजी व १२०० किलो कांदे विकून झाले!**

वर्तमानपत्रे चालू नसली तरी आपल्या या उपक्रमाचा दोन दिवसांत वाऱ्याच्या गतीने पुण्यात आणि गावात प्रसार झाला. देणारे आणि घेणारे दोघेही आग्रह करत होते. आता रचना बसवण्याची गरज वाटायला लागली ——

१) आधी मागणी नोंदवायची. २) त्या प्रमाणे शेतकऱ्याला भाजी मागणी प्रमाणे काढायला सांगायची. ३) गावागावातून गोळा करायची ४) पुणेभर वितरण करायचे. ५) कामेही त्याच क्रमाने करायची.

तसे काही सोपे नव्हते, कारण लॉकडाऊन चालू होते. अनेक रस्ते वाहतुकीसाठी बंद होते. गावातला टेम्पो भाजी घेऊन बाहेर पडायला परवानगी लागत होती, त्यामुळे **आपल्या वाहनाला 'अत्यावश्यक सेवा' परवाना काढायचा,** वितरकांना कोरोना काळजी घेत सारे करायचे आणि काही शे किलो भाजी व फळे असे नाशवंत सामान मागणी केलेल्या व्यक्ती पर्यंत पोचवायचे ठरवले.

**मग प्रबोधिनीचे कार्यकर्ते कामालाच लागले!** मागणी **नोंदवण्यासाठी ॲप बनवले गेले. व्हॉटस ॲपने प्रचार सुरू** झाला. सिंहगड रोड, सातारा रोड, कोथरूड, गावभाग असे व्हॉटस ॲपचे गट केले. म्हणता-म्हणता एकेका गटात २५७ सभासद होऊन गट पूर्ण झाले, मग दुसरा गट, असे एकूण सात गट तयार केले. साधारण १३००+ सभासद गटात सहभागी झाले. भरपूर मागणी नोंदवली गेली.

आता मात्र पुरवठ्याची रचना अपुरी पडणार का काय, असे वाटायला लागले. **युद्धपातळीवर कामाला सुरुवात झाली.** मागणी नुसार विभागवार पुणे शहरात भाजी वितरण करण्यासाठी रस्ते माहिती असणारे युवक, युवक विभागाने शोधून कामाला लावले तर ग्रामीण महिलांनी भाजी-फळे मिळवून वजन करून क्रेटमध्ये बसतील असे पाहिले. वांगी, दुधी, टोमॅटो, भेंडी असं कीट तयार करणे; चिक्कू, अंजीर अर्धा/एक किलोत पॅकिंग करणे असे **५००-५५० किलोचे पॅकिंग एकेका दिवशी सुरू झाले.** हे चालू काम जे लांबून बघत होते ते सुद्धा उत्साहाने मदतीला धावून आले. मनुष्यशक्ती कामाला लावायची पण कोरोना लॉकडाऊनचे सर्व नियम पाळून. त्यामुळे, गाडीत डिलिव्हरी द्यायला जातानाही दोन पेक्षा जास्त जणांनी एकत्र बसायचे नाही, मास्क हवेत, हे सारे केले.

काम सुरू झाल्यावर प्रश्नही सुरू झाले. पहिल्या दिवशी सारे प्लॅस्टिक पिशवीत भरले तर दुसऱ्या दिवशी भाजी भरायला पिशव्याच नव्हत्या. दुकाने बंद त्यामुळे मिळणारही नव्हत्या असे लक्षात आले. मग रद्दी गोळा केली, त्याच्या पिशव्या तयार केल्या. अगदी स्टेपलरच्या पिना संपल्या, लॉकडाऊनममुळे त्याही मिळणार नाहीत, मग पिशव्या पुरवायची जबाबदारी युवती विभागाने सांभाळली. कागदी पिशव्यात फळे भरली, भाजीसाठी कापडी पिशव्या वापरल्या पण त्याही खूप नव्हत्या. एकीकडे गावात निरोप देऊन त्याचे उत्पादन सुरू केले, तर ग्राहकांना सांगितले की भाजी घ्यायला येताना पिशवी घेऊन या, पिशवीत भाजी ओतून घ्या. कापडी पिशवी हवी असेल तर वर १० रुपये द्यावे लागतील, पण पिशवी परत केलीत तर हवी आहे. ग्राहकांनी साथ दिली. बहुतेक पिशव्या परत आल्या.

ग्राहकांनी फक्त मागणी देऊन मदत केली असं नाही, तर युवक गट भाजी वाटप करताना 'भाजी'च्या वेळेला म्हणजे सकाळी-संध्याकाळी पोचला असे झाले नाही. कधी ऐन दुपारी सुद्धा पोचला तरी फोनवर बोलणे झाल्या प्रमाणे ठरलेल्या ठिकाणी बहुतेक जण आले. पोलिसांनी **रस्ते बंद केले असताना मोकळे रस्ते शोधत एखाद्या पत्त्याच्या जवळपास जाणे सुद्धा लॉकडाऊनमध्ये सोपे नव्हते.** त्यामुळे कधी वेळ पुढेमागे झाली तर कधी एखादी मागणी केलेली **भाजी एवढ्या डिलिव्हरी करताना पुढेमागे झाली. तरी कोणी तक्रार केली नाही. हे ग्राहकांचे सहकार्य खूप महत्त्वाचे होते.** भाजी-फळे वितरण करताना ज्याला डिलिव्हरी द्यायची त्याचा फोन लागला नाही म्हणून जर एखाद्या घरी जावे लागले तर मिळणारा पाहुणचार 'भाजीवाला आला', असा नव्हता तर प्रबोधिनीचा प्रतिनिधी आला असा होता, असे अनेक युवकांनी आवर्जून सांगितले.

'भाजी' या विषयाशी अनेक युवक प्रथमच सामोरे गेले होते! त्यामुळे कुठली भाजी हळुवारपणे हाताळायची पासून भाजी-फळाच्या किंमती काय असतात अशा अनेक गोष्टींची माहिती करून घ्यावी लागली होती. चुकत होते तरी नव्या उत्साहाने शिकत काम करत होते हे विशेष!

**तेरा दिवसांच्या कालावधीत प्रत्यक्ष वाटप सहा दिवस झाले. ह्या मदतकार्यात साधारण ८०० जणांना एकूण ६,७३४ किलो कांदे, भाजी व फळे खरेदी करून वितरण केले.** पावणे **दोन - दोन लाख रुपयांची उलाढाल झाली.** सहा गावांतल्या २५ जणांचा माल या रचनेतून वितरण झाला. एकूण ३० पेक्षा जास्त जणांचे स्वेच्छेने केलेले काम १७० पेक्षा जास्त मनुष्य दिवसांचे झाले. एवढ्या कमी वेळात एवढी मनुष्यशक्ती उभी करून असे काहीतरी करता येईल असे वाटले नव्हते, सगळ्यांनी मिळून जमवले. त्यामुळे उपक्रमकर्त्यांचा विश्वास दुणावला! आता नियोजन करून अजून काहीतरी मोठे करू असे वाटायला लागले. खूप ताण आला त्यामुळे 'झाले तेवढे बास' असे कोणालाच वाटले नाही, तर या उपक्रमातून

## ♦ विशेष ♦

**• निगडी केंद्राची भागाला भेट**

निगडी केंद्रातील पालक प्रतिनिधींची ४५ जणांची सकुटुंब सहल आपले काम बघायला आली होती. शिवापूर, आंबवणे, आस्कवडी, वेल्हे, गुंजवणी अशा गावांना भेटी दिल्या. शिवापूर व वेल्हे अशा केंद्रात तपशीलात चर्चा झाली. या सहलीला माहिती द्यायला १७ कार्यकर्त्यांनी काम केले, सगळ्यांचा सहभाग मनापासून, उत्तम होता. अगदी यंत्रशाळा, बचत गट पासून कातकरी व सहनिवासापर्यंत सर्व प्रकल्पाची माहिती दिली. विक्री स्टॉल देखील लावला होता. एकूणच भेट परिणामकारक झाली.

**• शैक्षणिक संधी**

**यशवंतराव मुक्त विद्यापीठाचे शैक्षणिक महत्त्व** : पदवीचे महत्त्व यानिमित्ताने आपण वंचित गटापर्यंत पोहोचवू शकलो. २०१२ पासून सुरू झालेल्या या कामात १०४ हिरकणींनी पूर्व तयारीची म्हणजेच बारावी समकक्ष परीक्षा दिली. ३० जणांचे पदवीपर्यंतचे शिक्षण आत्तापर्यंत पूर्ण झाले आहे. जून २०२१ या शैक्षणिक वर्षात आठ जणींनी प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतला. पाच जणी प्रथम वर्ष उत्तीर्ण झाल्या, तीन जणींनी पूर्वतयारी परीक्षा दिली.

यंदा सात जणींनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे शिक्षण घ्यायला सुरुवात केली.

सर्व कार्यकर्त्यांना नवीन ऊर्जा मिळाली.

अजूनही प्रतिसाद आहे, पण ज्या शेतकरी गटासाठी सुरू केले त्यांची शेते खरीपासाठी रिकामी करायची वेळ झाली. पुण्यात संध्याकाळी पावसाने हजेरी लावायला सुरुवात केली आणि आता अशी भाजी वितरण व्यवस्थाही गरजेची राहिली नाही. कारण रोजचे भाजीवाले नियमित यायला लागले आणि अनेक गटांनी हा उपक्रम हाती घेतला; मग कुठे नगरसेवक पुढे आले तर कुठे देवस्थाने पुढे आली.

भाजी आली आणि पोच झाली. आता संपलीही! उत्पादकाकडून थेट ग्राहकापर्यंत वितरण करण्याचा प्रबोधिनीच्या नव्या पिढीचा एक प्रयोग यशस्वीरीत्या पूर्ण झाला. नाशवंत म्हणजे काय पासून **शेतकऱ्याला भाव मिळवून देताना नुसतीच करुणा उपयोगी पडत नाही, रचना बसवणे कसे गरजेचे आहे हे आम्ही सारे जण शिकलो.** तेव्हाच नेमकी निर्मला सीतारामन यांनी FPO (Farmer Producer Organizetion) संबंधी काही घोषणा केली. काल पर्यंत ती नुसती बातमी बातमी झाली असती. आता पुढील कामासाठी त्याच्या अभ्यासाला सुरुवात झाली!!

**हे सर्व शक्य झाले ते वेगवेगळे प्रयोग करून पाहण्यासाठी स्वतः कष्टाने मिळविलेला पैसा या कामासाठी उपलब्ध करून देणाऱ्या अनेकानेक देणगीदारांमुळे. बदलाची प्रक्रिया प्रभावीपणे व्हावी म्हणून वेग वाढविण्यासाठी हातभार लावलेल्या व्यावसायिक सामाजिक जबाबदारीच्या (CSR) भागीदारीमुळेच! त्या सर्वांचे मनापासून आभार.**

**✻ देणगीदार ✻**

| नाव | रुपये | | | | |
|---|---|---|---|---|---|
| रवी आवटे | १०,०००/- | अलका पटवर्धन | १०,०००/- | गायत्री सेवक | २५,०००/- |
| श्रीपाद खरे | १०,०००/- | सुषमा मराठे | ११,०००/- | ब्रम्हे ॲन्ड सन्स | २५,०००/- |
| मधुरा तळेगावकर | १०,०००/- | अमलेंदु सोमण | १२,१०१/- | गौरी कोल्हटकर | २८,६००/- |
| मुकुंद साने | १०,०००/- | विद्या जोशी | १५,०००/- | अजिंक्य बापट | ३०,०००/- |
| कल्याणी मांडके | १०,०००/- | ओंकार मांडके | १५,०००/- | सुनीती तुळापुरकर | ५०,०००/- |
| अमोल फाटक | १०,०००/- | विक्रम कामठे | १५,०००/- | मकरानंद दामले | ५१,०००/- |
| प्राजक्ता दातार | १०,०००/- | वंदना कामठे | २५,०००/- | विकास अन्वेष | ६४,९४२/- |

| | | | |
|---|---|---|---|
| उषा लिमये | ७०,०००/- | विजय बाळकृष्ण लागू | १,३०,०००/- |
| डॉ. शुभांगी कानेटकर | १,००,०००/- | महावतार बाबाजी फौंडेशन | १,७५,०००/- |
| मंदार गोडबोले | १,००,०००/- | रोटरी क्लब ऑफ पुणे | २,४०,०००/- |
| माधुरी देशपांडे | १,००,०००/- | एन्. जी. परांजपे प्रतिष्ठान | ७,००,०००/- |
| पद्मजा जोशी | १,०५,०००/- | अडोर लिमिटेड | १२,२१,०००/- |
| बायो वेद लिमिटेड | १,०७,६००/- | जानकीदेवी बजाज ग्राम विकास संस्था | २१,००,०००/- |

**✻ ५०० ते ९०००/-मधील देणगीदार ✻**

डॉ. रसिका गुप्ता, ज्योत्स्ना सोमण, सुषमा मराठे, भूपेर पाटणकर, उज्ज्वला जोगळेकर,
सुप्रिया म्हरोळकर, अर्पणा चितळे, अरविंद गोडबोले, मंदार श्रोत्री, गिरीश गाडगीळ,
जिव्हाळा फौंडेशन, विनायक खांदवे, संदीप चिपळूणकर, अदिती गोसावी, हेमलता राव,
मंदार बापट, रोहिणी गोखले, शिरीष दिघे, बी.एस.स्वामी, अंजली खत्री,
मकरंद गोडबोले, श्री संजीव आंबेकर, रोहिणी गोखले. शल्पा वैद्य, सिद्धार्थ देसाई,
षा गोखले, विलास ठुसे, रोटरी क्लब ऑफ पुणे साउथ

**ज्ञान प्रबोधिनीला दिलेल्या देणग्या आयकर कायद्याच्या परि. ८० (जी) खाली करमुक्त आहेत.**

**'ज्ञान प्रबोधिनी' या नावाने धनादेश काढावा**

संपर्क : **ज्ञान प्रबोधिनी : स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण),**
५१० सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० दूरभाष : (०२०) २४२०७१६२/१३३



जास्वंद वर्ग, राजगड सहल



वर्षभर काम करणारा गट



मा. संचालक गिरीशराव, करंजावणे
प्राथमिक आरोग्य केंद्र भेट



सूर्य नमस्कार



मंगलाताई गोडबोले यांच्यासोबत



We are one's सोबत
महिला दिवस



मर्क्सतर्फे वेल्हे बालवाडी
फिल्टरवाटप


प्रेषक

**ज्ञान प्रबोधिनी**
**स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण)**
५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०
दूरभाष क्र.२४२०७१६२, २४२०७०००
email: ssprabodhan@jnanaprabodhini.org